स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : महात्मा फुले – डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित रक्तदान शिबिरात ७१ जणांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबीराचे उद्घाटन कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. रमेश सरदार, प्रा.म.सु. पगारे, वित्त व लेखाधिकारी रवींद्र पाटील, प्रा. आर.जे. रामटेके, प्रा. जितेंद्र नाईक आदी उपस्थित होते. यावेळी अधिसभा सदस्य प्रा. विशाल पराते, सुरेखा पाटील, विद्या परिषद सदस्य प्रा. रमेश सरदार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रक्तदान शिबिराचे समन्वयक अरूण सपकाळे यांनी केले. आभार मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष जयंत सोनवणे यांनी मानले. या शिबिरात ७१ शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, दैनिक वेतनिक आणि विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

शिबीराच्या यशस्वीतेसाठी इंडियन रेडक्रास सोसायटी जळगावचे डॉ. अरविंद चौधरी, तिलोत्तमा जोशी, निता पाटील, दिशा पाटील, महेश ओतारी व अन्वर यांच्यासह राजू सोनवणे, सुभाष पवार, विकास बिऱ्हाडे, भिमराव तायडे, विठ्ठल धनगर, निता शिंदे, दिलीप अल्हाट, प्रा. आर.आर. चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त उद्या शुक्रवार दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारा पासून प्रशासकीय इमारती पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरणूक काढण्यात येणार असून सकाळी १०.३० वाजता प्रा. दीपक गायकवाड, पुणे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणी मधील योगदान' या विषयावर व्याख्यान होईल.अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.डॉ. व्ही.एल.माहेश्वरी राहतील.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सॉफ्टबॉल (पुरुष) संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले.

पंजाब विद्यापीठ, चंदीगढ येथे नुकतीच ही स्पर्धा झाली. यांसघात प्रितेश पाटील (केसीई शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव), गौरव चौधरी, धिरज बाविस्कर, राज भिलारे, मोहित पाटील, सागर साळुंखे (मु.जे. महाविद्यालय, जळगाव), वेदांत आरडे (नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव), आदित्य मोरे (आय.एम.आर. जळगाव), प्रतिक देशमुख, अर्जून राठोड (बाहेती महाविद्यालय, जळगाव), योगेश साळुंखे (रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव), उमेद विसपुते (सद्गुरु शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव), आशिष सोनवणे, मंगेश वाडीले (पुज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळ, शहादा), दशरथ जाधव, रवींद्र पावरा (बी.पी. कला वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगाव) यांचा समावेश होता. संघ प्रशिक्षक म्हणून प्रा. जयंत जाधव (रायसोनी महाविद्यालय, जळगाव) यांनी काम पाहिले. या यशाबद्दल कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी अभिनंदन केले अशी माहिती क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी